# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११०१८
## औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी

**विषय – परदेशात विविध शैक्षणिक संस्थेत विदयार्थ्यांना शैक्षणिक कोर्सेस उपलब्ध करुन देणेबाबत इच्छुक संस्थाकडुन अर्ज मागविणेकामी मुदतवाढ देणेबाबत...**

**जाहिर प्रकटन क्रमांक – क्र.औप्रसं/०३/कावि/१६/२०२४ दि.०६/०२/२०२४**

# शुध्दीपत्रक क्र. २

सदर जाहिर प्रकटनाचे अनुषंगाने अर्ज / प्रस्ताव स्विकृती दिनांक - २८/०६/२०२४ दुपारी - ३.०० वाजेपर्यंत वाढविणेत येत आहे.

इतर तपशिलात कोणताही बदल नाही.

| | |
|---|---|
| **अर्ज / प्रस्ताव स्विकृती दिनांक व वेळ** | **दिनांक - २८/०६/२०२४**<br>**वेळ - दु.३.०० वाजेपर्यंत** |

(उल्हास जगताप)
अति.आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

क्र.औप्रसं/०३/कावि/ ६६ /२०२४
दि. २१/०६/२०२४

१३६

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११०१८
## औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी

विषय – परदेशात विविध शैक्षणिक संस्थेत विदयार्थ्यांना शैक्षणिक कोर्सेस उपलब्ध करुन देणेबाबत इच्छुक संस्थाकडुन अर्ज मागविणेकामी मुदतवाढ देणेबाबत...

जाहिर प्रकटन क्रमांक – क्र.औप्रसं/०३/कावि/१६/२०२४ दि.०६/०२/२०२४

## शुध्दीपत्रक

सदर जाहिर प्रकटनाचे अनुषंगाने अर्ज / प्रस्ताव स्विकृती दिनांक -22/०३/२०२४ दुपारी - ३.०० वाजेपर्यंत वाढविणेत येत आहे.

इतर तपशिलात कोणताही बदल नाही.

| | |
|---|---|
| अर्ज / प्रस्ताव स्विकृती दिनांक व वेळ | दिनांक - 22/०३/२०२४<br>वेळ - दु.३.०० वाजेपर्यंत |

(उल्हास जगताप)
अति.आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

क्र.औप्रसं/०३/कावि/ 82/२०२४
दि.15/०३/२०२४

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## औद्योगिक प्रशिक्षण विभाग

पिंपरी – ४११ ०१८

## जाहिर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या मात्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये वास्तव्य असलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांकरीता परदेशात कौशल्य विकासासंबंधित व इतर विविध शैक्षणिक कोर्सेस (शिक्षण) उपलब्ध करुन देणेकामी परदेशी विद्यापीठ / शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळवून देणे त्याकरीता आवश्यक बाबींचे सहाय्य उदा. इंग्रजी भाषा परिक्षेसाठी मार्गदर्शन, व्हीसा काढणेकामी मार्गदर्शन, परदेशात राहणेकामी तसेच रोजगार उपलब्ध करुन देणे इत्यादी करणेकामी या क्षेत्रात १० वर्षांचा अनुभव असलेल्या अनुभवी इच्छुक पात्र संस्थाकडून अर्ज मागविणेत येत आहे. त्यानुसार इच्छुक अर्हताधारक संस्थांनी प्रस्तावाची हार्डकॉपीची एक प्रत (बंद पाकीट क्रमांक १ व २) औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी, पिंपरी – १८ येथे मुदतीत सादर करावी. या विषयाची सविस्तर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

परदेशात शिक्षण व नोकरी करण्यास इच्छुक असणा-या विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्ताव इच्छुक अर्हताधारक संस्थेने सादर करणे अत्यावश्यक आहे. त्याकरीता इच्छुक संस्थेची असणारी अर्हता व इतर आवश्यक अर्टी-शर्ती / निकष याबाबत सविस्तर माहिती महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर भरती (Recruitment) या लिंकवर तसेच होमपेजवर आमच्या बद्दल ⟶ (About) नोकरी विषयक (Recruitment) या मेनूमध्ये दि. १४ /०२/२०२४ पासून पाहण्यास उपलब्ध होईल. इच्छुक संस्थांनी मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या सविस्तर माहितीच्या अनुषंगाने त्यांचेकडील सर्व माहिती आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे, अनुभवाचे दाखले, नोंदणी प्रमाणपत्र एका सिलबंद पाकीटात (पाकीट क्रमांक-१) व दरपत्रक (प्रपत्र – अ) दुस-या सिलबंद पाकीटात (पाकीट क्रमांक-२) अंतिम दिनांकापूर्वी वेळेमध्ये मा. प्राचार्य, औद्यौगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी कोर्ट व अमृतेश्वर कॉलनी शेजारी, मोरवाडी, पिंपरी - १८. यांचे नावे दि. ०५/०३/२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत टपालाने पोहचतील अथवा समक्ष बंद पाकिटात सादर करावेत. मुदतीत प्राप्त न झालेले व अर्धवट असलेले प्रस्ताव यांचा कोणताही विचार केला जाणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

क्र. औप्रसं/०३/कावि/ १६ /२०२४

दि. ०६ /०२/२०२४

## परदेशात विविध शैक्षणिक सस्थांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शैक्षणिक अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेबाबत अर्हता धारक इच्छुक संस्थाकडुन अर्ज मागविणेबाबत सविस्तर माहिती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या मात्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये वास्तव्य असलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांकरीता परदेशात कौशल्य विकासासंबंधित व इतर विविध शैक्षणिक कोर्सेस (शिक्षण) उपलब्ध करुन देणेकामी परदेशी विद्यापीठ / शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळवून देणे त्याकरीता आवश्यक बाबींचे सहाय्य उदा. इंग्रजी भाषा परिक्षेसाठी मार्गदर्शन, व्हीसा काढणेकामी मार्गदर्शन, परदेशात राहणेकामी तसेच रोजगार उपलब्ध करुन देणे इत्यादी करणेकामी या क्षेत्रात १० वर्षांचा अनुभव असलेल्या अनुभवी इच्छुक अर्हता धारक संस्थाकडून अर्ज मागविणेतयेत आहेत. त्यानुसार इच्छुक संस्थांनी त्यांचेकडील परिपूर्ण प्रस्तावाची व प्रपत्र – अ ची एक प्रत (हार्डकॉपी) आवश्यक त्या कागदपत्रासह मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी, पिंपरी-१८. यांचे नावे अथवा समक्ष खालील मुदतीत सादर करावी.

**प्रस्ताव स्विकारण्याचा कालावधी - दि. १४ /०२ /२०२४ ते दि.०५ /०३ /२०२४ पर्यंत**

**अंतिम दिनांक व वेळ - दि. ०५ /०३ /२०२४ दुपारी ३.०० पर्यंत**

इच्छुक संस्थेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८. यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

सदर प्रस्ताव सादर करणेबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास मा. प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी पिंपरी पुणे – ४११०१८ यांचेशी समक्ष संपर्क साधून याबाबतची अधिक माहिती उपलब्ध करुन घेणेत यावी.

❖ **इच्छुक संस्थांनी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहे.**

१) इच्छुक संस्था कार्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडे कंपनी ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत असावी त्याचे पुराव्यार्थ संस्थेने नोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत सादर करणे आवश्यक राहील.

२) या क्षेत्रातील राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय मानांकन (accreditation) प्राप्त असणे आवश्यक असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) परदेशातील विद्यापीठे, कॉलेजेस, तांत्रिक व अतांत्रिक शैक्षणिक संस्थाबरोबर काम करण्याचा संस्थेस १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. याकामी किती वर्षाचा व किती देशांबरोबरचा अनुभव आहे, त्याबाबतचा पुरावा सादर करणेत यावा.

४) विद्यार्थ्यांना विविध परीक्षांसाठी प्रशिक्षण देणे व पात्रता चाचण्या (ऑनलाईन / ऑफलाईन) घेण्याचा संस्थेस १० वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. त्याबाबत असलेल्या अनुभवाचे पुरावे सादर करण्यात यावे.

५) विद्यार्थी व पालक यांचे समुपदेशन करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. याबाबत किती विद्यार्थी व पालक यांचे समुपदेशन केले आहे याचे पुरावे जोडण्यात यावे.

६) संस्थेची परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी हेल्पलाईन अस्तित्वात असावी.

७) विद्यार्थ्यांना परदेशात अथवा भारतात नोकरी मिळेपर्यंत Placement Support देणे आवश्यक. याकामी किती विद्यार्थ्यांना संस्थेने परदेशात व भारतात Placement / नोकरी मिळवून दिली आहे याबाबत पुरावे जोडण्यात यावे.

८) परदेशातील तांत्रिक व अतांत्रिक शिक्षण संस्थांबरोबर सदर संस्था संलग्न असणे आवश्यक. याबाबत परदेशातील किती तांत्रिक व अतांत्रिक शिक्षण संस्थांबरोबर संलग्नता आहे याबाबतचे पुरावे जोडण्यात यावे.

९) नॅशलन स्कील डेव्हलपमेंन्ट कॉर्पोरेशन (NSDC) , नवी दिल्ली यांचे कडे Training Partner म्हणून संस्थेची नोंदणी असणे आवश्यक.

१०) परदेशी शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांकरीता कार्यशाळा तसेच तज्ञ व्यक्तींच्या भेटीबाबत नियोजन करणे.

११) इतर शिक्षण पूर्ण झालेल्या व परदेशी शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांकरीता परदेशात कौशल्य विकासासंबंधित व इतर विविध शैक्षणिक कोर्सेस (शिक्षण) उपलब्ध करुन देणेकामी मार्गदर्शन करणे.

१२) विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार किंवा उद्योजक बनण्यासाठी आवश्यकतेनुसार उदा. स्टार्टअप, विविध शासकीय योजना इ. बाबत मार्गदर्शन देणे आवश्यक.

१३) परदेशातील तांत्रिक व अतांत्रिक शैक्षणिक संस्थांबरोबर एज्युकेशनल इन्स्टिट्यूटस, वोकेशनल इन्स्टिट्यूट यांना भेट देणेबाबत पात्र संस्थेने सुरवातीस पिंपरी चिंचवड महानगरपालिका / औद्योगिक प्रशिक्षण विभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या परदेश दौऱ्याबाबत संपूर्ण नियोजन करणे आवश्यक राहील.

१४) परदेशी शैक्षणिक अभ्यासक्रम (कोर्स) करीता विद्यार्थ्यांना व्हिसा (visa) मिळवून देणे तसेच कोर्स पूर्ण झाल्यावर त्याठिकाणी विद्यार्थ्यांना परदेशात नोकरी करावयाची झाल्यास त्याकामी नोकरी कालावधी करिता व्हिसा (Visa) मिळवून देणे यासाठी विद्यार्थ्यांना संपूर्ण सहकार्य व मार्गदर्शन करणे आवश्यक.

१५) परदेशात शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची सदर शैक्षणिक संस्थेत मुदतीत जाणेसाठी (प्रवेशासाठी) विमान / रेल्वे तिकिट उपलब्ध होणेकामी आवश्यक व्यवस्था व सहकार्य करण्याची जबाबदारी घेणे आवश्यक राहील.

१६) परदेशी विविध तांत्रिक व अतांत्रिक शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षणासाठी विविध बँकाकडून विद्यार्थ्यांना माफक व्याजदरात शैक्षणिक कर्ज सहाय्य उपलब्ध करणेकामी सहकार्य करणे आवश्यक.

१७) परदेशातील शैक्षणिक संस्था मध्ये शिक्षण घेण्यास निवड झालेल्या विद्यार्थ्यांची सदर शैक्षणिक संस्थात ऍडमिशन प्रक्रिया पूर्ण करुन देणे तसेच संबंधित बाबींसाठी विद्यार्थ्यांना पूर्ण सहकार्य करणे आवश्यक.

१८) परदेशात शैक्षणिक संस्थात ऍडमिशन केलेल्या / निवड झालेल्या विद्यार्थ्यांची त्याठिकाणी राहण्याची (Hostel), दोन्ही वेळेच्या जेवणाची व नाष्टाची सुविधा उपलब्ध होणेकामी सहाय्य तसेच विद्यार्थ्यांना आर्थिक मदत व्हावी व शिक्षण पूर्ण व्हावे यादृष्टीने शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने त्यांच्यासाठी शैक्षणिक कालावधीत संबंधित देशातील कायद्याच्या कक्षेत छोट्या-मोठ्या नोकरीची संधी इंटर्नशिप (Internship) उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर सर्व व्यवस्था होईल व विद्यार्थ्यांना कोणताही शारीरीक / मानसिक / आर्थिक त्रास होणार नाही याची संपूर्ण खबरदारी संस्थेने घेणे आवश्यक आहे. त्याकरीता आवश्यक समन्वय ठेवणेकामी व्यवस्था करणेची जबाबदारी संस्थेची राहील.

१९) शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत सर्व विद्यार्थ्यांकडे संस्थेने वैयक्तीकरीत्या लक्ष घालून त्यांचा संपूर्ण कोर्स व्यवस्थितपणे पार पडेल यासाठी विद्यार्थ्यांना संपूर्ण मागदर्शन करणे आवश्यक राहील. तसेच कोर्सची व विद्यार्थ्यांची वेळोवेळी अद्यायावत माहिती (अपडेट) विद्यार्थ्यांचे पालक तसेच आय.टी.आय विभागास पुरविणे बंधनकारक राहील.

२०) शैक्षणिक वर्ष संपून पास आऊट होणा-या विद्यार्थ्यांसाठी रिझल्ट लागणेच्या आधी भारतात / परदेशात नोकरीसाठी (जॉब) चांगल्या कंपनीत (ज्या कंपनीचे भवितव्य व विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल आहे.) उत्तम प्रकारचा जॉब शोधून काढून ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वोतोपरी विहित मुदतीत संपूर्ण सहकार्य करणे.तसेचपरदेशात विद्यार्थ्यांना Permanent Residency मिळणेकामी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करणेबाबत प्रयत्न करणे.

२१) या संपूर्ण योजनेकरीता इच्छुक संस्थेने सोबत जोडलेल्या प्रपत्र – अ मध्ये प्रति विद्यार्थी फी / शुल्क (सर्व करासहीत) इ. इच्छुक संस्थेने माहिती सादर करावी.

२२) निवड झालेल्या संस्थेबरोबर सदर कामाबाबत ३ वर्षांचा करारनामा करण्यात येईल. या कालावधीत दरवर्षी त्यांनी पुरवीलेल्या सेवा-सुविधा व केलेले कामकाज यांची पडताळणी मनपामार्फत करण्यात येईल.

२३) परदेशातील शिक्षणाकरीता विद्यार्थ्यांनी बँकामार्फत शैक्षणिक कर्ज घेणे आवश्यक राहील. त्याकरीता महापालिका जबाबदार राहणार नाही.

२४) निवड झालेल्या संस्थेस महापालिकेच्या वतीने मा. महापालिका सभेच्या मंजूर धोरणानुसार इंग्रजी भाषा उदा. IELTS इत्यादी व व्हीसा (Visa) फी अदा करणेत येईल.

२५) या योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या आय.टी.आय उत्तीर्ण विद्यार्थी / विद्यार्थीनींना परदेशी शिक्षणासाठी आवश्यक असलेला इंग्रजी अथवा इतर भाषा प्रमाणपत्र प्रशिक्षण (उदा. IELTS इत्यादी) पूर्ण करणेकरिता महापालिकेच्या आय.टी.आय मार्फत निवड केलेल्या तज्ञ संस्थेमार्फत मोफत प्रशिक्षण देणेत येईल या प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष खर्च अथवा जास्तीत जास्त र.रु. ७,५००/- प्रती विद्यार्थी ECS द्वारे संबंधित तज्ञ प्रशिक्षण संस्थेस मनपा आय.टी.आय मार्फत अदा करणेत येईल.

२६) या योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या आय.टी.आय उत्तीर्ण विद्यार्थ्यांला परदेशी शिक्षणासाठी जाणेकरिता “व्हीसा” आवश्यक असल्याने प्रती विद्यार्थी प्रत्यक्ष “व्हीसा” फी संबंधित देशाच्या दूतावासास त्यांच्या त्या – त्या वेळच्या नियमाप्रमाणे व जास्तीस जास्त र.रु.३०,०००/- (अक्षरी र.रु. तीस हजार फक्त) ECS द्वारे थेट पध्दतीने तज्ञ संस्थेच्या मदतीने मनपा आय.टी.आय मार्फत अदा करणेत येईल.

परदेशात शिक्षण घेण्यास इच्छुक असणा-या विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने वरील सर्व नमूद निकष / बाबी या इच्छुक संस्थेने पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. तरी इच्छुक संस्थेने याकरीता दोन स्वतंत्र बंद पाकिटात माहिती सादर करावी. बंद पाकिट क्रमांक – १ मध्ये इच्छुक संस्थेने अ.क्र. १ ते ९ चे अनुषंगाने नोदणी प्रमाणपत्र (Certificate) व सबळ पुरावे (आकारण्यात येणारी फी / शुल्क वगळून) सादर करावे. तर बंद पाकिट क्रमांक – २ मध्ये सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र – अ मधील निकषाच्या अनुषंगाने या संपूर्ण योजनेकरीता आकारण्यात येणारी प्रति विद्यार्थी फी / शुल्क नमूद करण्यात यावी. म्हणजेच पाकिट क्र. २ मध्ये केवळ प्रपत्र - अ असेल व हे पाकिट सिल / व्यवस्थित बंद करुन पाकिट क्र.१ सह कार्यालयात सादर करावे. याप्रकारे दोन स्वतंत्र बंद पाकिट क्रमांक १ व २ विहित मुदतीत मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी यांचे नावे अथवा समक्ष सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घेणेत यावी.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**औद्योगिक प्रशिक्षण विभाग**
**परदेशात विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शैक्षणिक अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेबाबत इच्छुक संस्थाकरीता निकष**
**'प्रपत्र – अ'**

| परदेशात विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शैक्षणिक अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेबाबत इच्छुक संस्थाकरीता निकष | संपूर्ण योजनेकरीता इच्छुक संस्थेकडून या सर्व निकषांच्या अनुषंगाने आकारली जाणारी प्रति विद्यार्थी फी / शुल्क सर्व करासहीत (र.रु.) एकत्रित नमूद करावी |
|---|---|
| • विद्यार्थ्यांना विविध परीक्षांसाठी प्रशिक्षण देणे व पात्रता चाचण्या (ऑनलाईन / ऑफलाईन) घेणे.<br>• विद्यार्थी व पालक यांचे समुपदेशन करणे.<br>• संस्थेची परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी हेल्पलाईन अस्तित्वात असणे.<br>• परदेशी शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांकरीता कार्यशाळा तसेच तज्ञ व्यक्तींच्या भेटीचे नियोजन करणे.<br>• इतर शिक्षण पूर्ण झालेल्या व परदेशी शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांकरीता परदेशात कौशल्य विकासासंबंधित व इतर विविध शैक्षणिक कोर्सेस (शिक्षण) कामी मार्गदर्शन करणे.<br>• विद्यार्थ्यांना परदेशात अथवा भारतात नोकरी मिळेपर्यंत Placement Support देणे.<br>• विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार किंवा उद्योजक बनण्यासाठी आवश्यकतेनुसार उदा. स्टार्टअप, विविध शासकीय योजना इ. बाबत मार्गदर्शन देणे.<br>• परदेशी शैक्षणिक अभ्यासक्रम (कोर्स) करीता विद्यार्थ्यांना व्हिसा (visa) मिळवून देणे व परदेशात नोकरी कालावधी करिता व्हिसा (Visa) मिळवून देणे याकामी विद्यार्थ्यांना संपूर्ण सहकार्य व मार्गदर्शन करणे.<br>• परदेशात शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची सदर शैक्षणिक संस्थेत मुदतीत जाणेसाठी (प्रवेशासाठी) विमान / रेल्वे तिकिट उपलब्ध होणेकामी आवश्यक व्यवस्था व सहकार्य करणे.<br>• परदेशी विविध तांत्रिक व अतांत्रिक शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षणासाठी विविध बँकाकडून विद्यार्थ्यांना माफक व्याजदरात शैक्षणिक कर्ज सहाय्य उपलब्ध करणेकामी सहकार्य करणे.<br>• परदेशातील शैक्षणिक संस्था मध्ये शिक्षण घेण्यास निवड झालेल्या विद्यार्थ्यांची सदर शैक्षणिक संस्थात ॲडमिशन प्रक्रिया पूर्ण करुन देणे तसेच संबंधित बाबींसाठी विद्यार्थ्यांना पूर्ण सहकार्य करणे.<br>• परदेशात शैक्षणिक संस्थात ॲडमिशन केलेल्या / निवड झालेल्या विद्यार्थ्यांची त्याठिकाणी राहण्याची (Hostel), दोन्ही वेळेच्या जेवणाची व नाष्टाची सुविधा उपलब्ध होणेकामी सहाय्य तसेच विद्यार्थ्यांना आर्थिक मदत व्हावी व शिक्षण पूर्ण व्हावे यादृष्टीने शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने त्यांच्यासाठी शैक्षणिक कालावधीत संबंधित देशातील कायद्याच्या कक्षेत छोट्या-मोठ्या नोकरीची संधी इंटर्नशिप (Internship) उपलब्ध करुन देणे व याकामी समन्वय ठेवणे.<br>• शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत सर्व विद्यार्थ्यांकडे इच्छुक संस्थेने वैयक्तीकरीत्या लक्ष घालून त्यांचा संपूर्ण कोर्स व्यवस्थितपणे पार पडेल यासाठी विद्यार्थ्यांना संपूर्ण मागदर्शन करणे, कोर्सची व विद्यार्थ्यांची वेळोवेळी अद्यायावत माहिती (अपडेट) विद्यार्थ्यांचे पालक तसेच आय.टी.आय विभागास पुरविणे.<br>• शैक्षणिक वर्ष संपून पास आऊट होणा-या विद्यार्थ्यांसाठी रिझल्ट लागणेच्या आधी भारतात / परदेशात नोकरीसाठी (जॉब) चांगल्या कंपनीत (ज्या कंपनीचे भवितव्य व विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल आहे.) उत्तम प्रकारचा जॉब शोधून काढून ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वोतोपरी विहित मुदतीत संपूर्ण सहकार्य करणे. तसेच परदेशात विद्यार्थ्यांना Permanent Residency मिळणेकामी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करणे. | |

**(संस्था / आस्थापना नाव)**
**सही व शिक्का**

(टिप :- सदर **'प्रपत्र –अ'** हे व्यवस्थित भरुन स्वतंत्र बंद पाकिट क्र.२ मध्ये सिलबंद करुन, बंद पाकिट क्र. १ सह सादर करावे.)

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८